महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना सहाय्यक अनुदान वितरीत करण्याबाबत. (माहे एप्रिल ते मे २०१९).

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक :- केव्हीबी-१११९/प्र.क्र.६३/उद्योग-६.

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- २४ मे, २०१९.

वाचा :
१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/२०१९-२०२०/ प्र. क्र. ३५/प्रशासन-१, दि.०३/०४/२०१९.
२) अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे क्र. कार्यासन -९/रानिवि/९५५३, ९५५४, दि. २५ मार्च २०१९ चे पत्र.
३) अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे क्र. कार्यासन -९/लेखा/४४० दि. ०४ मे, २०१९ चे पत्र.
४) अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे क्र. कार्यासन -९/लेखा/४४२ दि. ०४ मे, २०१९ चे पत्र.
५) अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे क्र. कार्यासन -९/लेखा/४९० दि. ०८ मे, २०१९ चे पत्र.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनयम, २०१९ ला महाराष्ट्र विधानमंडळाने मंजूरी दिली असून, सदर विधेयकाचे आता अधिनियमात रुपांतर झालेले आहे. सदर अधिनियम महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-४, दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी प्रसिध्द झालेला आहे सदर अधिनियमान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत अनुदानातून माहे एप्रिल,२०१९ ते जुलै २०१९ या ४ महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी रु. २२०६.७० लाख इतकी तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे. या तरतुदीतुन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास माहे एप्रिल, २०१९ ते मे २०१९ या २ महिन्यांसाठी वेतन व वेतनेतर खर्च भागवण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

शासन निर्णय:-

१. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांना माहे एप्रिल व मे या दोन महिन्यांचा खर्च भागवण्यासाठी ३६ सहाय्यक अनुदान (वेतन) या उद्दिष्टांसाठी रूपये १०५६.९८ लक्ष व ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या उद्दिष्टांसाठी रूपये ४६.४८ लक्ष असे एकूण रुपये ११०३.४६ लक्ष (रूपये अकरा कोटी तीन लक्ष सेहेचाळीस हजार फक्त) इतके अनुदान वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. यावरील खर्च मागणी क्रमांक के-७, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, १०५ खादी व ग्रामोद्योग (००) (०१) खादी व ग्रामोद्योग मंडळाला सहाय्यक अनुदान (दत्तमत) (२८५१ ०५८५) ३६, सहाय्यक अनुदान (वेतन) व ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या उद्दिष्टांखालील सन २०१९-२० या अर्थसंकल्पीय वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३.   सदर रक्कमेच्या आहरण व संवितरणाचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. सदर अनुदान खर्च झाल्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र मंडळाने शासनास व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना विहित कालावधीत सादर करावे. तसेच लेख्यांच्या खर्चमेळाबाबत महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांच्याकडून विचारणा करण्यात येईल, तेव्हा लेख्यासंबंधीची आवश्यक ती कागदपत्रे मंडळाने महालेखापाल कार्यालयास सादर करावीत.

४.   सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३० / २०१३/ विनियम, दि.१७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८- भाग-१, उपविभाग-१, अनुक्रमांक २७ नियम क्रमांक १४९ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०५२४१३१३४२९२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajiv Madhav Ambikar

Digitally signed by Rajiv Madhav Ambikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4afb47d807935092599a3e28024dd3d3c461bada30a950e81e666a02aad578f5, cn=Rajiv Madhav Ambikar
Date: 2019.05.24 13:19:53 +05'30'

(राजीव आंबीकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
३. अर्थ सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वरिष्ठ उप महालेखापाल (पडताळणी) बाह्य लेखा परीक्षा विभाग, मुंबई.
९. लेखा अधिकारी, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई. (५ प्रती)
१०. कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१६/अर्थसंकल्प-१४/अर्थोपाय), मंत्रालय, मुं-३२
११. कार्यासन अधिकारी (प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (उद्योग-६).